# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक:22.05.2024** **वार :बुधवार**

---

**नाव**

उजनी धरणाच्या जलाशयात काल एक प्रवासी नाव उलटून झालेल्या दुर्घटनेतील सहा जणांचा शोध अद्याप लागलेला नाही. राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकांना ही नाव सापडली आहे मात्र त्यात बसलेल्या लोकांचा थांग लांगलेला नाही. नावेमध्ये सहाजण होते, अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**पोर्शे**

पुण्यातील कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी अल्पवयीन मुलाचे वडील विशाल अगरवाल यांना 24 मेपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश सत्र न्यायालयानं आज दिले. तसंच अल्पवयीन मुलाला मद्य पुरवठा करणारे बार मालक, व्यवस्थापक नितेश शेवानी आणि जयेश बोनकर यांना सुद्धा तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश सत्र न्यायालयानं दिले. ब्लॅक पबमध्ये नितेश शेवानी आणि जयेश बोनकर यांनी कोणाच्या सदस्यत्वावर अल्पवयीन मुलाला प्रवेश दिला. तसच विशाल अगरवाल यांनी नोंदणी क्रमांक नसलेली गाडी आपल्या मुलाला का चालवायला दिली? वडिलांनी अल्पवयीन मुलाला पबमध्ये जाण्याची का संमती दिली? मुलाला खर्च करण्यासाठी कुठल्या स्वरूपात पैसे दिले? असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी न्यायालयात केला. विशाल अग्रवाल यांना आज न्यायालयात आणण्यात आलं त्यावेळी वंदे भारत संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर शाई फेकण्याचा प्रयत्न केला. या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं.

**बाल**

18 वर्षे पूर्ण नसतील तर बालगुन्हेगार म्हणून गंभीर गुन्ह्यातून आरोपीची सुटका होण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी ही वयोमर्यादा 16 वर्षे करावी अशी मागणी महाराष्ट्र पोलीस मित्र सघटनेचे अध्यक्ष राजेद्र कपोते यांनी केली आहे. याबाबतचं निवेदन त्यांनी मुख्यमत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं आहे.

**आरटीओ**

पुण्यातील कल्याणीनगरमधील अपघाताच्या पार्श्वभूमीवर पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने विनानोंदणी रस्त्यावर धावत असलेल्या वाहनांवर कारवाई सुरू केली आहे. अशी वाहनं आढळल्यास त्याची विक्री करणाऱ्या वितरकाचा व्यवसाय परवाना निलंबित करण्यात येईल. शहरातील वितरकांना विनानोंदणी वाहन ग्राहकांना देऊ नये, अशा सूचना करण्यात आल्या आहेत अशी माहिती प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी दिली.

**हवामान**

गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरातील दिवसाच्या तापमानात पुन्हा एकदा कमालीची वाढ दिसून आली असून त्यामुळं नागरिक हैराण झाले आहेत. शहराच्या बहुतांश भागात दिवसाचं सरासरी तापमान 40 ते 42 अंशाच्या आसपास नोंदवण्यात आलं असून रात्रीच्या तापमानात देखील पुरेशी घट होत नसल्यानं शिवाय हवेतील आर्द्रता वाढल्यानं अंगातून घामाच्या धारा निघत आहेत.

**कारवाई**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं सुमारे 18 हजार चौरस फूट जागेवरील अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाची कारवाई आज करण्यात आली. शहरातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाई यापुढेही चालू राहणार असून शहरातील नागरिकांनी रितसर परवानगी घेऊनच बांधकामं करावीत असं आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केलं आहे.

**कर-पीसीएमसी**

पिंपरी-चिंचवड मनपाच्या तिजोरीत दीड महिन्यातच दोनशे कोटी रुपये महसूल जमा झाला आहे. 25 टक्के मालमत्ताधारकांनी कर भरला असून इतरांनी दहा ते वीस टक्के कर सवलतीचा लाभ घेण्याचं आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केलं आहे.

**जेनेरिक**

राज्य आरोग्य विभागाकडून पुणे महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये जेनेरिक औषधांची दुकानं सुरू करण्यात येणार आहेत. ही दुकानं येत्या दोन महिन्यात सुरू होतील असं सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर संजीव वावरे यांनी सांगितलं.

**कोरोना**

नवीन कोरोना विषाणूच्या केपी 2 या उपप्रकाराचे सर्वाधिक 51 रूग्ण पुणे जिल्हयात आढळून आले आहेत. अशी माहिती जीनोम सिक्वेन्सिकगचे राज्य समन्वयक डॉक्टर राजेश कार्यकर्ते यांनी दिली.

**फलक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं काल 4 अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यात आली. तसंच 9 फलकधारकांनी स्वत: प्रशासनाला सहकार्य करत आपले अनधिकृत फलक काढून टाकल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**मेधा**

पुणे शहरातील इमारतींच्या छतावर नियम धाब्यावर बसवून जाहिरात फलक लावण्यासाठी परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी भाजपच्या खासदार डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्याकडं केली आहे.

**स्टॉल**

पुण्याजवळील ऐतिहासिक सिंहगडावर स्थानिक विक्रेत्यांसाठी उभारण्यात आलेल्या स्टॉलचं काम येत्या 15 जूनपर्यंत पूर्ण करुन ते स्टॉल संबंधित चालकांच्या ताब्यात देण्याचे निर्देश वन विभागानं दिले आहेत. या कामाच्या पूर्णत्वाची मुदत संपून गेली तरी हे काम अद्याप अपूर्ण आहे.

**सूर्यदत्त**

इयत्ता बारावीच्या परीक्षेत सूर्यदत्त संस्था समूहाच्या कनिष्ठ महाविद्यालय आणि पब्लिक स्कुलचा निकाल 100 टक्के लागला आहे. संस्थेच्या सर्वच शाखांच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवत शाळेसाठी ही कामगिरी केली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**